दिनांक 10/01/2024 रोजीचा प्रशासकिय ठराव क्र. 219

विषय – स्वच्छ सर्वेक्षण व माझी वसुंधरा अभियानाच्या अनुषंगाने घेण्यात आलेल्या नाविन्यपूर्ण मशिनरी यांची दुरुस्ती करणे बाबत निर्णय घेणे.

संदर्भ- मा.मुख्याधिकारी यांनी आरोग्य निरिक्षक यांची दिनांक 01/01/2024 रोजी मंजूर केलेली टिपणी.

विटा नगरपरिषदेची 2011 च्या जनगणनेनुसार लोकसंख्या 48289 असून सध्याची लोकसंख्या अंदाजे 55,000 इतकी आहे. शहराचे एकूण क्षेत्रफळ 55.15 चौ.कि.मी इतके मोठ्या प्रमाणात विस्तारलेले आहे. शहराच्या विस्तार वाढीमुळे आरोग्य सुविधा वाढविणे, त्याची सुधारणा करणे गरजेचे आहे. स्वच्छ भारत अभियानात विटा नगरपरिषदेने उत्तम कामगीरी केली होती. सन 2019-2020 च्या दरम्यान सदरच्या नाविन्यपुर्ण मशिनरी खरेदी केल्या होत्या. 1) ICT & Solar Based Smart Urinal 2) ICT & Solar Based Smart TwinBin 3) IOT Based Solar Powered Water Trash Cleaner

सदर वरील तिनही नाविन्यपुर्ण मशिनरी सद्यस्थितीत नादुरूस्त असलेने त्या दुरूस्त करणेस मंजूरी देत आहे. याकामी पुढील आवश्यक ती नियमबध्द कार्यवाही करणेत यावी.

सही/-
( डॉ.विक्रम बांदल )
प्रशासक
विटा नगरपरिषद विटा

दिनांक 10/01/2024 रोजीचा प्रशासकिय ठराव क्र. 220

विषय – नगरपरिषद वाहन विभागाकडील अग्निशामक वाहन क्र. एम. एच. 10 पी 1008 साठी होजरी पाईप खरेदी करणेबाबत निर्णय घेणे.

संदर्भ- मा.मुख्याधिकारी यांनी वाहन व्यवस्थापक यांची दिनांक 05/01/2024 रोजी मंजूर केलेली टिपणी.

विटा नगरपरिषद वाहन विभागाकडील अग्निशामक वाहन क्र.एम.एच.10 पी 1008 हे वाहन आग विझविणेकामी अत्यावश्यक सेवेसाठी वापरले जाते. परंतु सध्या होजरी पाईप खराब झालेने काम करणे आडचणीचे होत आहे. सदरच्या वाहनासाठी 60 मीटर होजरी पाईप खरेदी करणे आवश्यक आहे.

तरी विटा नगरपरिषद वाहन विभागाकडील अग्निशामक वाहन क्र.एम.एच. 10 पी 1008 या वाहनासाठी होजरी पाईप खरेदी करणेस मंजुरी देत आहे. याकामी पुढील आवश्यक ती नियमबध्द कार्यवाही करणेत यावी.

सही/-
( डॉ.विक्रम बांदल )
प्रशासक
विटा नगरपरिषद विटा

दिनांक 10/01/2024 रोजीचा प्रशासकिय ठराव क्र. 221

विषय – केंद्रशासन पुरस्कृत अमृत 2.0 / महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान योजनेअंतर्गत विटा नगरपरिषदेचे सुधारीत पाणी पुरवठा योजनेचे सविस्तर प्रकल्प अहवालाचे शासन निर्णयाप्रमाणे स्वःनिधी हिस्सा भरणेबाबत निर्णय घेणे.

संदर्भ- 1) मा.मुख्याधिकारी यांनी पा.पु.ज.नि.व स्वच्छता अभियंता यांची दिनांक 09/01/2024 रोजी मंजूर केलेली टिपणी.

2) शासन निर्णय क्रमांकः अमृत-2022/प्र.क्र. 141/नवि-33 मंत्रालय, मुंबई -32 दि. 14 जुलै 2022 3) शासन निर्णय क्रमांकः नगरो-2014/प्र.क्र. 119/नवि-33 मंत्रालय, मुंबई – 32 दि. 21 ऑगस्ट 2014

4) मा. मुख्य अभियंता, म.जी.प्रा. पुणे यांचे तांत्रिक मंजूरीचे पत्र जा.क्र.मु.अ. (पुणे)/तांशा 3/नगरोत्थान/ विटा पापुयो/ 44 /2023 दि.05/01/2024

केंद्रशासन पुरस्कृत अमृत 2.0/ महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान योजनेअंतर्गत विटा नगरपरिषदेचे सुधारीत पाणी पुरवठा योजनेचे सविस्तर प्रकल्प अहवालाचे शासन निर्णयाप्रमाणे स्वः निधी हिस्सा भरणे आवश्यक आहे.

तरी शासन निर्णयाप्रमाणे स्वः निधीचा हिस्सा भरणेस मंजूरी देत आहे. याकामी पुढील आवश्यक ती नियमबध्द कार्यवाही करणेत यावी.

सही/-
( डॉ.विक्रम बांदल )
प्रशासक
विटा नगरपरिषद विटा